प्लेग नियंत्रण पथकातील ३ अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : प्लेग-२०१७/अपदे/प्र.क्र.३३०/आरोग्य-५
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार,
संकुल इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: १३ ऑक्टोबर, २०१७

संदर्भ :-

१) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : पदआ-२००७/प्र.क्र.११७/सेवा-१ दि.०६/०८/२००७. (आकृतीबंध)**
२) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : हिनिका२०१२/अपदे/प्र.क्र.१६६/आ-५, दि.३० एप्रिल, २०१२.**
३) **सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्रमांक : प्लेग-२०१७/अपदे/प्र.क्र.९९/आ-५ दि.३० मार्च, २०१७.**
४) **सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/आस्था/कक्ष ५/ टे ३/०३ अपदे/४२२०-२१/१७, दि.१५/०९/२०१७.**

प्रस्तावना :-

महाराष्ट्रात १९५३ पासून प्लेगचे रुग्ण आढळून आले नसल्यामुळे दि. २६ नोव्हेंबर, १९८७ च्या शासन निर्णयानुसार प्लेग सर्वेक्षण पथक बंद करण्यात आले होते. तथापि, राज्यात बीड जिल्ह्यातील मामला गावामध्ये ऑगस्ट/सप्टेंबर, १९९४ मध्ये संशयित प्लेग आढळून आला होता. राज्यातील सर्व जिल्ह्यात एकूण ६३४ रुग्णांचे रक्तजल नमुने प्लेगसाठी दुषित आढळून आले होते. म्हणून ३ ऑक्टोबर, १९९४ मध्ये प्लेग नियंत्रण पथक पुन:श्च स्थापन करण्यात आले. त्यानंतर राज्यात उद्याप प्लेगचा एकही रुग्ण आढळून आलेला नाही. तथापि, खबरदारीचा उपाय म्हणून प्लेग पथकामार्फत बीड, लातूर, उस्मानाबाद, पुणे, सातारा, सोलापूर या जिल्ह्यात उंदीर व पिसवा यांची तपासणी नियमित करण्यात येत आहे. त्यामुळे प्लेग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत ३ अस्थायी पदे वित्त विभागाच्या सहमतीने सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. प्लेग-२०१७/अपदे/प्र.क्र.९९/आरोग्य-५, दिनांक ३० मार्च, २०१७ अन्वये दि.०१.०३.२०१७ ते दि.३०.०९.२०१७ पर्यंत चालू ठेवण्यास मंजुरी देण्यात आली होती. सदर मुदत दि.३०.०९.२०१७ रोजी संपुष्टात आली असल्याने, सदरहू ३ अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे-१ या कार्यालयाच्या अधिपत्याखाली प्लेग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत एकूण १७ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १ पद आढाव्याअंती स्थायी स्वरुपाचे आहे. उर्वरित १६ अस्थायी पदांपैकी १३ पदे संदर्भ क्र.२ येथे नमूद शासन निर्णयान्वये स्थायी करण्यात आली आहेत. उर्वरित ३ अस्थायी पदांना वित्त विभागाच्या सहमतीने संदर्भ क्र. ३ येथे नमूद शासन निर्णयान्वये दि.०१/०३/२०१७ ते दि.३०/०९/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर ३ अस्थायी पदे राज्यातील जनतेला आरोग्य विषयक सेवा सातत्याने उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने आवश्यक असल्याने, सदर ३ अस्थायी पदे दि.०१/१०/२०१७ ते दि.३१/१२/२०१७ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयाद्वारे मंजुरी देण्यात येत आहे.

प्लेग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्यरत ३ अस्थाई पदांचा तपशिल

अ.क्र.	पदनिर्मितीच्या शासन निर्णयाचा क्रमांक व दिनांक	पदनाम	पदांची संख्या	वेतनश्रेणी (रुपये)
१	शा.नि., सा.आ.वि., क्र.पदआ-२००६/१२८/ प्र.क्र.१९/आ-२, दि.३०/१२/२००६ व क्र.पदआ-२००७/प्र.क्र.११७/सेवा-१, दि.०६/०८/२००७	मजदूर (मुख्यालय)	३	४४४०-७४४०+ ग्रेड पे रु.१३००

३. वरील पदांवरील खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक : १ आर
२२१०-वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६-सार्वजनिक आरोग्य
१०१- रोग प्रतिबंध व नियंत्रण
(०१) रोग प्रतिबंध व नियंत्रण
(०१) (०४) प्लेग प्रतिबंधक संघटना
सांकेतांक २२१० ०६०२ (अनिवार्य)

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि २०१६/प्र.क्र.०८/आ.पु.क., दि.०३ ऑक्टोबर, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१३१११५१६७६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sharad B. Londhe

Digitally signed by Sharad B. Londhe
DN: CN = Sharad B. Londhe, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.10.13 15:09:08 +05'30'

(श. बा. लोंढे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
२) संचालक, आरोग्य सेवा, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
३) सह संचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई/पुणे
४) सहसंचालक, आरोग्य सेवा (हि.ह. व ज.रो.), पुणे-१/६.
५) उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ, पुणे.
६) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) लेखा व कोषागार अधिकारी, मुंबई.
८) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१०) वित्त विभाग, व्यय-१३, अर्थसंकल्प-३, अर्थसकल्प-९, आ.पु.क., मंत्रालय, मुंबई.
११) सार्वजनिक आरोग्य विभाग, अर्थसंकल्प शाखा, सेवा-१, सेवा-५, मंत्रालय, मुंबई.
१२) निवडनस्ती (आरोग्य-५).